# शिवराज

सत्याहत्तर- अठ्ठ्याहत्तर

1977/78

SHIVRAJ COLLEGE GAD. GADHINGLAJ



सेवा परमो धर्मः ।

कर्मवीर विठ्ठल रामजी शिक्षण संस्था, गडहिंग्लज

# शिवराज कॉलेज

## १९७७-७८

# शिवराज

अध्यक्ष

**बाळासाहेब माने**

प्रकाशक

**बलवंत देशमुख**

संपादक

**वैजनाथ महाजन**

# ऋणनिर्देश

प्रेरणा– बलवंत देशमुख

मुखपृष्ठ– विष्णू सुरंगे

संपर्क– जगन्नाथ वाघमोडे

प्रासंगिक– जयंत सबनीस

ठसे– विलास बकरे,
श्री प्रोसेस, शिवाजी पुतळा, कोल्हापूर.

मुद्रण– श्यामकान्त पाध्ये
गर्जना मुद्रणालय, १३०३ ए, कोल्हापूर.

# गव्हर्निंग कौन्सिल

| | | | |
|---|---|---|---|
| १ | माननीय | बाळासाहेब माने | अध्यक्ष |
| २ | ,, | धोंडीराम कदम | उपाध्यक्ष |
| ३ | ,, | डॉ. गणपतराव सावंत | उपाध्यक्ष |
| ४ | प्राचार्य | बलवंत देशमुख | सचिव |
| ५ | मान. | ॲड.श्रीपतराव शिंदे | सदस्य |
| ६ | ,, | शंकरराव चव्हाण | ,, |
| ७ | ,, | नागाप्पाण्णा बटकडली | ,, |
| ८ | ,, | गणपतराव देसाई | ,, |
| ९ | ,, | धोंडीराम पताडे | ,, |
| १० | ,, ,, | बाबूराव मोहिते | ,, |
| ११ | ,, | शंकरराव देसाई | ,, |
| १२ | ,, | व्यंकटेश फडणीस | ,, |
| १३ | ,, | प्रा.नामदेवराव दुंडगेकर | ,, |
| १४ | ,, ,, | शंकरराव जाधव | ,, |
| १५ | ,, | भैरू मोहिते | ,, |

# श्रद्धांजली

| | |
|---|---|
| 'जोगिया'चे | – ग. दि. माडगूळकर |
| 'छांदसी'चे | – पु. शि. रेगे |
| 'शिदोरी'चे | – व. ह. पिटके |
| सत्यशोधक | – हमीद दलवाई |
| 'शिकार कथा' कार | – भानू शिरधनकर |
| महाकवि | – सुमित्रानंदन पंत |
| विश्व विनोदकार | – चार्ली चॅपलीन |
| राष्ट्रीय पंडित | – बाळशास्त्री खुपेरकर |
| 'साहित्य अकादमी'चे | – सुनितीकुमार चटर्जी |
| काव्य समीक्षक | – भवानी शंकर पंडित |
| महाराष्ट्र बँकेचे | – चिं. वि. जोग |
| लोकोत्तर गायक | – पंकज मलिक |
| 'विद्या भवन'च्या | – लिलावती मुन्शी |
| 'सहकारी' | – वामनराव वर्दे |
| कसोटी वीर | – मामा घोरपडे |
| 'अंतरा'कार | – केशवराव भोळे |
| जुन्या लेखिका | – मुक्ताबाई दीक्षित |
| गाढे व्यासंगी | – प. लं. वैद्य |
| 'प्राणी शास्त्रज्ञ' | – डॉ. देवीदास कामत |
| 'महाराष्ट्र मंडळा'चे | – कॅप्टन शि. वि. दामले |
| 'समाज'कार | – सर्जेराव पाटील |

साताराचे छ. प्रतापसिंह भोसले, कराडचे काका करंबेळकर, विचारवंत वि. म. बेडेकर, वि. द. घाटे, सखारामपंत घाटगे

कळत न कळत आपले जीवन सुखावह करणारी, विभिन्न क्षेत्रातील ही लहान–थोर मंडळी यावर्षी आपणास सोडून गेली. त्यांना ही सखेद आणि सविनय श्रद्धांजली.

**– संपादक**

चेअरमन



मा. बाळासाहेब माने

# प्राचार्य



मा. बलवंत देशमुख

कर्मवीरांच्या शिक्षणाचा वारसा



बॅरि. पी. जी. पाटील याना निरोप

दोन संपन्न
कुलगुरू. एक
यशस्वितेची
परिपूर्ती
तर एक
यशस्वितेकडे
वाटचाल

समाज प्रबोधनाचा वारसा



प्राचार्य बी. एस्. भणगे यांचे स्वागत

# संकलपन

शिवराजच्या मित्रांनो—

शिवराजचे हे अष्टयाहत्तरचे वार्षिक. सुटसुटीत पण सुंदर. अंक तसा छोटेखानी आहे पण आपल्या चोखंदळ विद्यार्थ्यांना आवडावा असा सजविण्याचा प्रयत्न केला आहे. अंकाची सजावट, मांडणी, अनुषंगिक कामातील तत्परता ह्या सर्व बाबी तशा गौण आहेत. असल्या भारवाहू कष्टाला तुमचे प्राध्यापक कधीच कमी पडत नाहीत. प्रश्न आहे तो अंकाच्या दर्जाचा. त्याच्या गुणवत्तेचा विकास करण्याचा. या दृष्टीने पहिली बाब अंकाच्या अंतरंगाची. साहित्य ! आणि संपन्न साहित्य ! शिवराजसाठी साहित्य विपुल आले पण निवड करताना उडदामाजी काळे गोरे अशी स्थिती. त्याबद्दल संपादकीय दादागिरीच्या भावात जाहीर वाच्यता करण्यात फारसा अर्थ नाही. मग उरले ते आकर्षण असल्या फोटो या प्रकरणाचे. मला व्यक्तिशः फोटो हे प्रकरण एकूण अप्रिय. त्यामुळे फोटो निवड ही जबाबदारी पार पाडताना मी अन्य जबाबदारीपेक्षा धास्तावून गेलेलो. जे फोटो निवडले ते आपल्या पुढे मौजुद आहेत. 'झणझणीत मेरिट' शिवाय फोटो यावा ही अपेक्षा फारशी वाजवी आहे असे मला वाटत नाही. अन्यथः यापुढे अंक व अल्बम असे दोन स्वतंत्र संग्रह प्रकाशित करावे लागतील. केशवसुतांनी म्हटल्याप्रमाणे अस्तित्वात असलेल्या वसुंधरेवर आपली कर्तृत्वशिल्पे कोरण्याची सिद्धता आपण करावी हेच बरे !

अंकासाठी अनेकांनी उस्फूर्तपणे सहाय्य केले. प्राचार्य देशमुखांनी सतत स्मरण तेवत ठेवले तर आमच्या विशाल मानस सुरंगेनी 'बेस्ट कव्हर' करुन दिले. त्यांचे मुखपृष्ठ ही आंध्र वादळग्रस्तांना चित्रांकित श्रद्धांजली आहे हे सांगणे नकोच. अंकासाठी कोल्हापूरच्या विलास बकरेनी अत्यंत तत्परतेने एकसे एक सुंदर ठसे बनवून दिले. काही दोस्तांनी किरकोळ का होईना पण जाहिराती दिल्या. गर्जना मुद्रणालयाचे कुशल कामगार त्वरेने काम करण्यात पटाईत ! त्यांनी बोलता बोलता छपाई संपविली. तसे यात माझे काहीच नाही. आपल्या अंकाबद्दलच्या संदर्भात मी तर फक्त संपर्कासाठी होतो. साहित्य स्वीकृतीच्या बाबतीत सार्‍यांचेच समाधान शक्य नव्हते व तसे मी ते फक्त पानांवर काळे केले आहे म्हणून कल्हीही इच्छित नाही. या निवडीच्या बाबतीत मात्र माझी भूमिका साक्षेपी होती. विद्यार्थ्यांना अद्याप लेखनानंद घेता येत नाही ही मोठी खेदाची बाब म्हणून नोंदवावीशी वाटते.

तर असा हा अल्पावधीत तयार केलेला आपला शिवराजचा अंक. तुमच्याच श्रमातून साकार झालेला. तुम्हा सार्‍या गुणग्राहक दाद देणाऱ्या विद्यार्थ्यांना तो आवडावा ही अपेक्षा. उणीवा विपुल आहेत. त्याची जाणीव म्या पामराला आहेच. अंकातील उणीवा ह्या आपण माझ्या मर्यादा समजाव्यात. या वर्षी आपण सार्‍यांनी माझ्यासारख्या नवागतावर ही जबाबदारी सोपविली ही तुम्हा सार्‍यांच्या मनाची थोरवी होय. प्राचार्य, प्राध्यापक आणि अन्य सहकाऱ्यांनी दिलेल्या सहकारातून मी प्रस्तुतचा अंक आपल्या हाती देत आहे याची मनोमन जाणीव ठेवूनच हा अंक तुम्हा सार्‍यांच्या वतीने आंध्र वादळग्रस्तांच्या सखेद स्मृतिस अर्पण करीत आहे...

— वैजनाथ महाजन

# आमचा ७७।७८ चा जिमखाना

## विविध विभागांचे प्राध्यापक

| | |
|---|---|
| **अध्यक्ष –** | **प्राचार्य बलवंतराव देशमुख** |
| १ **जिमखाना चेअरमन** | **डॉ. एस. जी. गोकाककर** |
| २ सांस्कृतिक व भीत्ती पत्रक | १) प्रा. व्ही. एम. बन्ने (प्रमुख) २) प्रा. बी. के. मोरटे<br>३) प्रा. व्ही. बी. महाजन ४) प्रा. बी. बी. भोसले<br>५) प्रा. कु. व्ही. व्ही. कुलकर्णी ६) प्रा. सौ. एस. एम. जगताप<br>७) प्रा. डी. जी. उप्पार. |
| ३ परीक्षा | १) प्रा. एस. टी. जाधव (प्रमुख) २) प्रा. सी. एम. गवमणे<br>३) प्रा. व्ही. एन. गजेंद्रगड ४) प्रा. ए. ए. पोवार<br>५ प्रा. बी. बी. भोसले |
| ४ वक्तृत्व | १) प्रा. के. व्ही. कुराडे (प्रमुख) २) प्रा. आर. पी. पाटील<br>३) प्रा. जे. डी. कांबळे |
| ५ खेळ, राष्ट्रीय छात्रदल व वसतीगृह | १) प्रा ए. एस. नाळे (प्रमुख) २) प्रा. सौ. एस. एम. जगताप<br>३) प्रा बी. बी. पुंडपळ |
| ६ नियतकालिक | १) प्रा. व्ही. बी. महाजन (प्रमुख) २) प्रा. सौ. एम. एम. जगताप<br>३) प्रा. व्ही. एम. बन्ने ४) प्रा. आर. पी. पाटील |
| ७ महल | १) प्रा. एम. टी. जाधव (प्रमुख) २) प्रा. ए. ए. पोवार<br>३) प्रा. सौ. एम. एन. कोटीभास्कर ४) प्रा. एस. व्ही. भंडारी<br>५) प्रा. सी. एम. गवमणे ६) प्रा. सौ. एम. एम. जगताप |
| ८ प्राध्यापक व विद्यार्थी कल्याण समिती | १) प्रा. ए. ए. पोवार (प्रमुख) २) प्रा. व्ही. एन गजेंद्रगड<br>३) प्रा एस व्ही भंडारी ४) प्रा जे एम वाघमोडे |

(पान ४३ वर पहा)

# मराठी



" स्वातंत्र्य हे माणसाचे मूलस्वरूपच आहे आणि लेखक कलावंताचे स्वातंत्र्य हे समाजाच्या कल्याणा–साठी अत्यावश्यक आहे. स्वातंत्र्य हे माणसाच्या जातीने अस्तित्वात आणलेले एक सांस्कृतिक मूल्य आहे असे सांस्कृतिक मूल्य म्हणूनच त्याचा विचार केला पाहिजे. स्वातंत्र्य हा जीवसृष्टीचा माणसाकडे आपणहून चालत आलेला वारसा नव्हे. "

– नरहर कुरुंदकर

एक व्यक्तिचिंतन

एक लेख

एक लघुनिबंध

एक कथा

आठ कविता

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात दलितांच्या हक्कासाठी चंदन प्रमाणे झिजणारा आणि दलित समाजातील भोळ्या भाबड्या जनतेला जागा करणारा, भारतीय राज्यघटनेचा निर्माता व महान घटनेचा शिल्पकार, दलितांचा हिरा आणि गुणीजनांचा मोहरा, उत्कृष्ठ अभ्यास आणि सखोल संशोधक इत्यादी विशेषणांनी अलंकृत झालेला दैदिप्तमान असा भारत मातेचा थोर सुपुत्र म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय.

नररत्नांची खाण म्हणून नावाजलेला रत्नागिरी जिल्हा आणि त्याच जिल्हातील आंबेवाडी हे लहानसे खेडे या ठिकाणी बाबासाहेबांचे वाडवडील रहात असत. काळाच्या गती प्रमाणे मूळगाव सोडून फलटणला जाणे त्यांना भाग पडले. वडिलांचे नाव रामजी आणि आईचे नाव भीमाबाई. भीमाबाईचे शेवटचे आणि चौदावे रत्न भीमबाळ. वडिल अत्यन्त निधड्या छातीचे बहाद्दर सैनिक तरीपण मनाचे प्रेमळ. आईच्या संस्कारक्षम वागणूकीमुळे भीमाबाळावर साहाजिकच चांगला परिणाम झाला. "स्वतःची कर्तव्ये जो चोख करतो तोच खरा माणूस आणि अन्यायाचा प्रतिकार केल्याशिवाय रहाणार नाही तोच खरा पुरुष" अशा प्रकारे वेदमंत्र रामजींनी भिमरावला दिला होता. लहानपणीच भीमाबाईच्या आई निवर्तल्या आणि रामजीने दुसरे लग्न केले. इंग्रजांच्या राजवटीत रामजी सुभेदाराचे काम करीत असत. परंतु हिंदुच्या चिथावणीमुळे महारांना नोकरी सोडण्यापर्यंत पाळी आली. पण रामजींनी न डगमगता मुलाच्या शिक्षणासाठी जन्मभूमी सोडली.

दापोलीच्या शाळेत भिमरावला पाठविण्यात आले. त्याच्या चांगल्या वागणुकीमुळे गुरुजींना त्याची दया आली. 'मायेला जातपात कळत नाही. ती आंधळी असते म्हणतात हेच खरे. गुरुजी ब्राह्मण तरीपण भीमबाळ विषयीचा लळा गुरुजींना दूर करु शकला नाही 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' या प्रमाणे भीमबाळ दुसऱ्या इयत्तेत गेला असतांनाच सर्वांचा लाडका झाला. अशा गुरुंची आठवण डॉ. आंबेडकर मोठे झाले तरी काढत असत. ही त्यांची गुरुभक्ती खास अनुकरणी अशीच आहे. काळाचे उलटे वारे वाहात असतांना सुद्धा कसलीही पर्वा न करता गुरुजींनी दाखवलेली माया खरोखरीच दिव्य होती. 'मायेविण देव न कळे निःसंदेह! गुरुविण अनुभव कैसा कळे' असं ज्ञानेश्वरांनी सांगितलं हेच खरं. आणि याच महानभुतिचा परिणाम भीमाचे डॉ बाबासाहेब झाले. आंबेडकरांच्या आयुष्यात सतत बदल जणू दैवानेच लिहून ठेवला होता.

नंतर आंबेडकर साताऱ्याला गेले सातारा त्यावेळी जातिविषमतेने भरलेला होता. मग महारांना कोण जवळ करणार! माणसं होती पण माणुसकी नव्हती. परंतु अशी संकटच महान धिरोदात्त पुरुषाची सत्व परीक्षा घेत असतात. संकटाना पाहून सच्चेवीर डगमगत नाहीत तर त्यांना उलट चेव येतो, आवेश येतो आणि संकटांवर मात करण्याची जिद्द निर्माण होती. त्याला डॉ. बाबासाहेब अपवाद कसे ठरणार? भीमाप्रमाणेच शरीरयष्ठी, ओजस्वीवाणी, तेजस्वी लेखणी आणि माणुसकी विषयी निष्ठा या गुणांचा सुरेख संगम म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर बाबा! खरोखरच किती सार्थ नांव! साऱ्या जनतेचे खरोखरीच ते बाबा होते. त्यात भीमाचा पराक्रम होता, अर्जुनाचा आवेश होता आणि धर्मराजाची नीती आणि उक्ती अशी वागणूक होती. प्रत्यक्ष धर्म, माणुसकी व सारे काही होते.

बाळपणात स्वतः खाल्लेल्या खस्ता, स्वतः सहन केलेले मानापमान, समाजाकडून झालेली छळवणुक, घरची

गरीबी या सर्वांचा विचार करून आपल्या दलित बांधवांच्या कल्याणासाठी, उद्धारासाठी आणि सुखासाठी एवढेच नव्हे तर त्यांना माणस म्हणून जगता यावे म्हणून स्वतः बाबासाहेबांनी टाकीचे घाव सोसले आणि म्हणनच त्यांना शेवटी देवकळा प्राप्त झाली या ब लमनावर लहानपणापासून सुसंस्कार होत गेले आणि म्हणूनच फळ त्यांना मिळाले. त्यांनी फक्त कार्य केले फळाची अपेक्षा त्यांनी धरलीच नाही. मी गरीब आहे, दीन, दीन आहे असे रडगाणे त्यांनी कधीच गाईले नाही. म्हणूनच स्वतःच्या कर्तृत्वावर डॉ. बाबासाहेब थोर पदास चढले.

बुद्ध आणि कबीर यांच्या जीवन चरित्राचा योग्य तोच परिणाम त्यांच्यावर झाला. ' मूर्ती घडविली गेली, सजविली गेली आणि सर्वसंपन्न गुणांनी सालंकृत झाली. असा सोन्याच्या गुणांनी सालंकृत झालेला दलितांचा हिरा साऱ्या भारताचा हिरा ठरला त्यात नवल ते काय ? बुद्धाची प्रचंड बुद्धी, कबीराची सेवा आणि म. फुल्यांची तळमळ या तिन्ही गुणांनी युक्त असा मुकुट बाबांनी परिधान केला. बाबासाहेबांचा वाचनाचा छंद म्हणजे एक दिव्य काम होय. २५०० पुस्तकांची लायब्ररी स्वतःची अशी त्यांनी निर्माण केली. आणि अर्थातच या सर्व पुस्तकांचे वाचन, चिंतन आणि मननही केले होते. विदेशात असताना रोज २० ते ३० लहानमोठी पुस्तके ( ग्रंथ ) वाचण्यासाठी सतत १८ तास आंबेडकर खर्च करीत असत. यावरून त्यांच्या वाचनाची कल्पना येईल. वाचनाचा संस्कार एवढा मोठा होता की, पाठच्या भावाची वाचनाची हौस भागविण्यासाठी बहिणीने स्वतःच जीवाभावाचं मंगळसूत्र पुस्तकासाठी गहाण ठेवलं. अशी ती तुळसाबाई ! खरोखरच धन्य होय. अर्थात या नराचा नारायण बनविण्यात तिचाही वाटा खास आहे; ' ज्ञानासारखी पवित्र विद्या दुसरी जगात नाही. " या धर्म वचना- प्रमाणे अनेक विषयाचा सखोल अभ्यास करावयाचा ही त्यांची जिद्द होती. बाबासाहेब संसार सागरात पडले तरीही ज्ञानसागरात बुडण्याची हौस कधी संपली नाही. संपणार कशी ? कारण ज्ञान हे आगाध आहे, अमर्याद आहे, अथांग आहे. एवढा मोठा शास्त्रज्ञ न्यूटन तो देखील म्हणायचा ' माझं हे ज्ञान कसलं, हे ज्ञान अजून मला खूप शिकायचे आहे. समुद्र किनाऱ्यावरील वाळूच्या कणाएवढे माझे ज्ञान ' अगदी अशीच स्थिती अगदी हाच विनय आंबेडकरांच्या ठिकाणी होता.

अशा प्रकारे विनयाचा, सेवेचा, सचोटीचा आणि प्रामाणिक पणाचा विजय झाला आणि म्हणूनच नवीन ज्ञानानें अलंकृत होण्यासाठी परदेशांत जाण्याची सोन्याची संधी मिळाली. इ. स. १९१३ साली घरा- दाराला सोडून व दलित बांधवाना सोडून मायदेशास काही काळापुरताच रामराम ठोकला. या गुणांच्या प्रतिचंद्रस्थाने परदेशांत देखील आपल्या गुणांचा मंगल प्रकाश पाडला. आणि तेथील प्राध्यापकांची मने जिंकली. त्यांना भूक लागली होती ती अथांग ज्ञानाची. अर्थातच ही कडाडून लागलेली भूक एवढ्यासाठी नव्हती तर हिंदुस्थानातील सात कोटी बांधवांच्या ज्ञानची भूक होती. त्यांच्या प्रेमाची भूक होती. त्यांचा उद्धार तोच आपला उद्धार हेच ब्रीद आणि हेच ध्येय आंबेडकराचे होते.

२६ जानेवारी १९५० रोजी भारतात खऱ्या अर्थाने लोकांचे राज्य सुरू झाले. २६ जानेवारी ही तारीख म्हणजे बाबांच्या बुद्धीचा वाढदिवस होय. खरोखर एका महाराच्या पोराने देशाचा एवढा मोठा भाग्यलेख लिहावा ही इतिहासात खास नमूद करण्या- सारखी गोष्ट आहे. बाबासाहेब आपल्या जीवनात कधीच पराभूत झाले नाहीत. रात्रंदिवस देशाच्या चिंतेने व्यग्र झालेला हा बुद्धीचा पुतळा याने आपल्या बुद्धीची चमक दाखविली ती घटनेतच होय. या घटनेने ख्रिस्तांच्या बायबलात, पैगंबरांच्या कुराणावर, ऋषींच्या वेदावर, बुद्धाच्या त्रिपीठीकेवर आणि लोकमान्यांच्या गीतारहस्यावर अक्षरशः मात केली. बाबासाहेब आंबेड- कर म्हणजे दलितांचे पंढरपूर. आणि पांडुरंगाच्या भेटी- साठी हजारो दलित वारकरी पुष्कळशी पायपीट करीत दर्शनास येत असत. पुढे बाबांनी 'दलित फेडरेशन पक्ष' स्थापन केला. आणि या पक्षासाठी 'आपल्या शरीरात शेवटचा रक्ताचा थेंब असेपर्यंत मी पक्ष टिकवीन काँग्रेसच्या हत्तीला भिवून जे पळून जातील ते खुशाल जावू देत मी एकटा राहून एकटा लढेन. मी काँग्रेसमध्ये असतो तर पहिला पंतप्रधान झालो असतो. असा आत्मविश्वास व्यक्त करणारा दुसरा महापुरुष आहे तरी कोणता ? बाबा म्हणजे दलितांचा निवारा ! सर्वांचा आसरा ! जेथे पक्षभेदास नाही थारा, अशी ही

आंबेडकरांच्या ज्ञानाची धारा गंगेप्रमाणे आणि चंद्रभागे-प्रमाणे अखंड अविरत आणि आमर वहात राहिल.

आंबेडकर ही भारताची ज्ञानगंगा आणि महाराष्ट्राची चंद्रभागा अविरत वहात राहिली ती केवळ दलितांच्या उद्धारासाठी. या दलितांच्या हिऱ्याची तीन दैवते होती. ती म्हणजे विद्या, विजय आणि शील. केवळ यांच्या आशीर्वादाने ज्ञानाची अखंड चोवीस तास उपासना करून हे विद्येचे भूषण भारत मातेच्या कंठ हारात चमकू लागले. बाबासाहेब म्हणायचे 'चिकाटीने वागा, सहकार्याने वागा, माणसासारखे वागा ?' बाबा केवळ उपदेशामृत देणार नव्हते तर 'बोले तैसा चाले' या संताच्या पंक्तित बसणारे होते, शोभणारे होते, पोतडीत सर्व काही भरलेले आहे. तुम्ही घाबरू नका किंवा घाबरून जावू नका 'हिंदु म्हणून जन्मलो तरी हिंदु म्हणून मरणार नाही' ही भीष्म प्रतिज्ञा त्यांनी खरी करून दाखविली. कारण त्यांना या हिंदुधर्माने माणूस म्हणून जगू दिले नाही. आणि जगविलेही नाही. म्हणून ते म्हणत, हा धर्म नको, खरी रूढी नको. बाबांचे कार्य अलौकीक. याला एकमात्र आधार सात कोटी दलितांच्या उद्धाराची जबाबदारी त्यांच्यावर होती. हिंदुधर्म सोडताना बाबाना दुःख झाले नाही असे नाही पण धर्मांतर करताना बाबा अक्षरशः रडले, कंठ दाटून आला ते म्हणाले, 'मी ज्ञानी झालो, देशासाठी झगडलो, सर्वस्व अर्पण केले. तरीही या लोकांनी विसळून घेतले नाही, या देशात जन्म घेतला हेच आमचं पाप !'

असा हा दलितांचा उद्धारकर्ता, दीन बांधवांचा संरक्षक आणि रक्षक, घटनेचा शिल्पकार, विज्ञानाचा शिरोमणी, दुःखीतांचा त्राता, सुखकर्ता आणि दुखःहर्ता थोर नेता ५ डिसेंबर १९५६ च्या काळ्या रात्री मान्या दलितजनाना दुःख सागरांत लोटून देवाघरी निघून गेला ! तो दिवस दलित जनाच्या शोकाचा परमोच्च बिंदू गाठणारा होता. सारा हिमालय गंगेत विरघळला. दशदिशांत दुःखाचा पांऊस पडला, सारी सृष्टी काळ-वंडली. वसुधरा भयकंपित झाली जनता जनार्दन दुःख सागरात बुडाला. दुःखाचा हा महापूर पाहून प्रत्यक्ष परमेश्वर सुद्धा स्वर्गात ढसढसा रडला असणार ! बाबा गेले सर्वांना सोडून गेले ! पण दिव्य संदेश देवून गेले ! महान कार्याची ज्योत पेटवून गेले ! ज्ञानाची गंगा प्रवाहित करून गेले ! म्हणून मी म्हणते बाबा देवाघरी गेले ! पण अमर राहिले ! म्हणूनच आज आम्ही दलितोद्धारक बाबासाहेबांच्या उज्वल चरित्राचे अंत-करणपूर्वक मनन करून त्यांचे अपुरे कार्य पूर्ण केले पाहिजे म्हणजेच त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभेल ! जयभीम! जय भारत !

✠ ✠


शुभेच्छा !

**कल्पक ॲडव्हर्टायझर्स**

प्लॅस्टिक मार्जिन बोर्डचे उत्पादक
आऊटडोअर होर्डिंग्ज कॉंट्रॅक्टर

**३२८ ई. दाभोळकर बंगला,**
नवी शाहूपुरी, कोल्हापूर ४१६००१.



With Best Compliments from

**UNIQUE PUBLISHING HOUSE**

1166, Sykes Extension,
Kolhapur.
Publishers of the best
quality Collegi0te. text books
for all courses.

## दीप्तिमान राष्ट्रकवी !

# कुसुमाग्रज

**अशोक परीट**
बी. ए. भाग– २

आधुनिक मराठीत केशवसुत, गोविंदाग्रज, तांबे यांनी आपल्या कवितांतून तीन संप्रदाय निर्माण केले आहेत. या तीन संप्रदायातील रम्य गुणविशेष एकजीव होऊन जणू काही कुसुमाग्रजांच्या कवितेतून अभिव्यक्त झाले आहेत. स्वतःच्या स्वतंत्र जीवननिष्ठेमुळे कविला स्वतःचे असे आगळे तेज प्राप्त झाले आहे. त्यांची कविता ही उपरोक्त तिन्ही संप्रदायरूपी प्रवाहांचे एकत्रीकरण होऊन बनलेल्या नव्या विशाल ओघाचा भव्य आरंभ होय.

अनुभवातील प्रक्रियांची जबरदस्त उलथापालथ दाखवून कुसुमाग्रज विरोधातून साकारलेले नाट्य अधिक परिणामकारक करतात. त्यांची 'हिमलाट' धरेला दुभंग करत येते. नागाचे खंड खंड होतात. आगगाडी शकले शकले होऊन कोसळते. जड स्वरूप असलेल्या वस्तूत हे घडते त्याप्रमाणे सूक्ष्म भाव संवेदनाच्या बाबतीतही. म्हणून कुसुमाग्रजांची प्रतिभा ही काळाच्या कणकाची दूती आहे. सर्वगामी, सार्वजनिक आणि सार्वत्रिक हे तिचे रूप होय. म्हणूनच ती सामाजिक न्यायासाठी, दीन–दलिताच्या उत्थापनासाठी धडपडते. या साऱ्याच्या मुक्तीसाठी क्रांतीमार्गाचाच पुरस्कार करणे अपरिहार्य आहे. समाजजीवनातील अनैतिकता, अन्याय अत्याचार, भ्रष्टाचार, दंभाचार या साऱ्यांच्याच निर्मूलनासाठी परमेश्वराचा धावा अथवा देवापुढे धरणे हे सर्वथा निरूपयोगी मार्ग आहेत. त्यासाठी क्रांतीमार्गाचाच पुरस्कार केला पाहिजे हे ओळखून त्यांनी काव्याच्या माध्यमातून क्रांतीचे बंड उभारले.

क्रांती हा प्रणव मंत्र आहे. ती एक उर्जस्वल शक्ती आहे. या शक्तीनेच सारे प्रश्न मिटू शकतील हा त्यांचा विश्वास आहे. म्हणून कवी " क्रांतीचा जय– जयकार " करतो आहे. क्रांतीचा जयजयकार, जालियनवाला बाग, जा जरा पूर्वेकडे, कोलंबसचे गर्वगीत, अहिनकुल, आगगाडी व जमीन, 'वादळला हा जीवन सागर' या त्यांच्या कविता क्रांतीचा पुरस्कार करणाऱ्या द्योतक ठरल्या आहेत.

" क्रांतीचा जयजयकार " ही कविता तर मृत्युंजय श्रद्धेतून उद्‌भवलेले एक अमर क्रांती सूक्तच ! मुठभरांनी विश्वसम्राटाला आव्हान देणारे नाट्य त्यामागील उदात्तता हे सारे लक्षात घेतले म्हणजे या कवितेचे वैभव काय आहे याची कल्पना येईल. तर " कोलंबसाचे गर्वगीत " म्हणजे मानवतेचे निशाण हाती घेऊन अज्ञाताच्या महासागरात नवनवीन प्रदेश धुंडाळण्यासाठी, जिंकण्यासाठी, निघालेल्या अपराजित वृत्तीच्या जीवनवीरांचे किंवा अशा असंख्य जीवन वीरांच्या प्रतिनिधींचे गर्वोदत्त स्फूर्तिप्रद भाषणच होय.

" नाविक आम्ही परंतु फिरतो सात नभाखाली"

अशी चेतना देऊन आणि अखेर आशीर्वाद व ध्येयाकांक्षाचा जीवंत मंत्रोच्चार करून कोलंबसाने तो क्षण जिंकला आहे.

आगगाडी व जमीन, अहि–नकुल या प्रतिकात्मक कविता आहेत. त्या मद्यःस्थितीवर भाष्य करणाऱ्या, सुष्ट–दुष्ट अशा भिन्न प्रवृत्ती प्रवाहाच्या रोमांचित वेध घेणाऱ्या ठरल्या आहेत.

" हवेत पेटला सुडाचा घुमारा "
कोसळे दरीत फुलाचा डोलारा
उलटी पालटी होऊन गाडी ती
हजार शकले पडती खालती.

अर्ज विनवण्यांना कोणत्या सत्ताधिशाने दाद



शिवराज ७७।७८

दिली आहे ? पण जेव्हा सहनशीलतेलाही एक मर्यादा असते आणि म्हणूनच तीहि एक दिवस बंड करुन सगळं सत्ताच पालथी पाडते.

" अहि-नकुल " ही याच पद्धतीची पण अधिक सूचक ठरणारी कविता आहे. जुलमी सत्ताधिशांच्या कडून बेमुर्वतपणे भरडली जाणारी जनता त्यांच्याशी निकराने लढून अंतर्धान पावणारा क्रांतीवीर यांचे भव्योदात्त चित्र रेखाटले आहे.

" जा जरा पूर्वेकडे " ही उपरोधात्मक कविता राक्षसी अन्याय, अत्याचार, करणाऱ्या साम्राज्यवाद्यावर ओढलेला आसूडच होय.

आर्तधावा आईचा ऐकून धावे अर्भक
ना जुमानी बंदूक "
आणि लांबे संगिनिला छान छोटे आतडे
जा जरा पूर्वेकडे "

या ओळीतील मनाला विव्हल करणारा स्वर तथाकथित संस्कृतीच्या अमानुषतेवर, ढोंगावर, प्रकाश पडणाराच आहे.

कुसुमाग्रजांच्या उपरोक्त कवितामधून अभि-व्यक्त झाले ते आशयधन पाहिले तर असे दिसून येते की, जिथे अन्याय घडतो आहे, घडला आहे तेथे कवि जातीनीशी धावतो आहे. देव धर्माच्या श्रद्धा सोडून देवून युयुत्सु अशा क्रांतीचा घोष करतो आहे. या उलट उत्कट पातळीवरील जीवननाटय रंगवताना कुसुमा-ग्रजांची प्रतिभा जणू अग्निरेखाच बनते; अन् धग-धगती आग ओकू लागते. " कोलंबसाचे गर्वगीत ' या कवितेत कोलंबसाचे प्रभावी व्यक्तिमत्व विराट सागर अन त्या विराट सागराच्या विराटतेचा प्रत्यय येईल. अशी कुसुमाग्रजांची प्रमत्त प्रतिभा या तिन्हींचाही एक संचरण येथे संगम झालेला आहे.

कवित्वशक्तीचे परमोत्कर्षास पोचलेले लखलखणारे दिव्य वैभव रसिकांना सढळ हाताने देणारे हे मानवतावादी कवी याच्या सहानुभूतीचे क्षेत्र नेहमी विशालच आहे. क्रांतीगीते लिहिणाऱ्या झुंजार अद्वितीय तेजाने तळपणाऱ्या लेखणीच्या सामर्थ्यशाली सतत्र अशा या कवीला मान्यवर टीकाकारानी कुसुमाग्रज एक यज्ञ संप्रदायी कवी, अग्निरेखेने काव्य लिहिणारा प्रकाशपूजक अशा शद्बात गौरव केला आहे. आधुनिक मराठी कवितेत इतक्या तेजोगर्भ आशय व्याप्तीच्या दिप्तर्थीने, संपन्नतेने, काव्यच निर्माण झाले नाही अशी कबुली भाऊसाहेब खांडेकरांनी दिली आहे. ते म्हणतात, " कुसुमाग्रज हे उद्याच्या तरुणांच्या आशा महत्वाकांक्षाना आव्हान आणि आवाहन देणारा महाकवी आहे. कुसुमाग्रज हे मानवतावादी कवी आहेत. म्हणतच ते क्रांतीवादी बनले आहेत. मानवतेची स्पष्ट ग्वाही ते देतात--"

" आकाशापरी या गहन माझी जननी
एक मानतो मी मानवता जोगव तिची ऋणा
दास्य अनिती सहानुभूती हीच माझी नीती.

या मानवतेच्या व्यापाच्या अधिष्ठानावरच कुसुमाग्रजांची कविता आधारलेली आहे. याचे दुसरे एक कारण असे की त्यांची प्रतिभा ही जशी काळाच्या कनकाची दुती आहे तसेच तिला भव्यतेचे स्वप्न पाहण्याचे उपजत वेड आहे. हे वेड असे देशाच्या, भाषेच्या धर्माच्या अनुभवाशी मामावलेले नाही तर देशकालाची राज्यपदाची बंधने तोडून अखंड मानवतावादी बनलेले आहे. या साऱ्यांचा प्रत्यय केवळ त्यांच्या सामाजिक, राजकीय कवितेतूनच येतो असे नाही तर प्रेमकविता ही देखील त्याला अपवाद नाही. म्हणूनच " पृथ्वीचे प्रेमगीत " लिहावयाचे त्याला सुचले. वस्तुत: हे काव्य म्हणजे खगोलशास्त्रीय सत्यावर कवी कल्पनेने केलेला एक रम्योदात विलास होय. पण त्यातून देखील अलौ-किक प्रेमाची की जिला वास्तवाचे पूर्णत: भान राहिलेले आहे असा प्रेमविश्वातील एक नाविन्यपूर्ण आशय त्यानी निर्माण केला आहे. " स्वप्नाची समाप्ती " या कवितेत गात नायक तर गळयात प्रेयसीचे नाजूक हात असताना सांगतो की--

" उजेडात दिसू वेडे आणि ठरू अपराधी म्हणून
काढ सखे गळयातील तुझे चांदण्याचे हात. "

म्हणजे धुंद करून टाकणाऱ्या प्रणयाने देखील हा कवी वास्तव विसरू शकत नाही. कारण प्रितीच्या धाग्यात उबेपेक्षा धगच त्याला जास्त जाणवते. हे मोहमयी पाश त्याला गुंतवू इच्छितात. म्हणून हे सारेच बंध तोडून तो तिला उगवत्या सूर्याची, भविष्याची, भवितव्याची चाहूल लागल्याची जाणीव करून देतो.

'तव गुरू विधीणा 'कवीने सर्वभेद हा वास्तवाभिमुख होऊन अनुसरून केले आहे. प्रेमाने देखील तो हे विसरू शकत नाही म्हणूनच तर कुसुमाग्रजांची कविता ही इतरांपेक्षा पृथगात्म झालेली आहे. याच अर्थानं वैचारिक, सामाजिक, राजकीय, राष्ट्रीय आणि क्रांती हा स्थायीभाव आहे. म्हणून कुसुमाग्रज हे मराठी मातीतून अग्निपराग फुलविणारा प्रमत्त प्रतिभेचा कवी होय !

✠

भर उन्हं त्यात लहर येते अन् मी ओढ्याकाठच्या मृगजळात जातो. दगड, झाडी आणि ओलाव्र आटत चाललेला चिखल. काठीला वठलेले चिंचेचे झाड. आणलेल्या पेपरवर त्याचे स्केच करतो. त्याचे रंग राखी काळपट भर उन्हात करकरीत सेडलाईट यांचा सरकता संसार रेंगाळत असतो.

ह्या वृक्षाची वलयं फार सुंदर वाटतात. निसर्गाला नैसर्गीक हात ! बराच वेळ दगडावर बसून त्या वृक्षात आकार शोधतो. हरीणासारखी मान, शोभेशी शिंगे आणि यांच्यावर लय. कुठच्या भागात एक बंडवला आपल्या हाताचे स्नायू ताणून मुठी आवळतो आहे. त्याचं शिर पिंजलेल्या केसाने तो काळया ज्वाळेत उभा जळत आहे. वेदना आहेत त्या लाजल्या आहेत.

तो अंधारात वेदनामय होतो. त्याच्यावरील लय सौंदर्य विसावा घेतं, अंधारात न्हात बसतं अन् पहाटे टवटवीत व्हायला लागतं.

अंधार म्हटला की, मला आजीचा देव्हारा आठवतो. मी आणि आजी ज्या अंधारातून तिच्या घराकडे देवपूजा करण्यासाठी जात असू तो अंधार. आजी आमच्या घरी. ती तिच्या घरी देवपूजासाठीच तेवढी जायची. त्या अंधारातून जात असताना वर्तमान युगातून गतयुगात गेल्यासारखे वाटायचे. मग देव्हारा दिसायचा. अनेक देवांची गर्दी. त्याच्या पाठीमागे भली मोठी विस्ताराची भिंत. मंद पांढरी.

आजी देव पूजायची. मी त्या भिंतीत ध्यानस्त व्हायचा. भिंतीला चारी बाजूस किनार. बाहुल्या-बाहुल्या, टींबा-टींबा आणि इतर. ती गजबजलेली असायची त्यात माझे डोळे मध्येच बुडायचे आणि पुढे कुठे तरी वर उठायचे. आणखीन बुडायचे...त्यात कसा वेळ जाई हे समजत नसे. त्याच्या आत आजीला झालेले विश्व दर्शन माझ्या डोळ्यासमोर तरळते.आत किनारवरीलच पण मोठ्या बाहुल्या. कंगोरे आलेल्या. त्यावेळी आजीच्या डोळयांच्या पापण्या दिसायच्या. हाताची बोटं उठवायची आणि त्याला काही रेषांची जोड देऊन पक्षांचे आकार साधलेले असायचे. कुठे राजाराणी ताटकळत उभी असायची. मोठे डोळे असलेले देवीचे चेहरे सुद्धा डोळयांत भरायचे. दीर्घ डोळे. काजळ भरताना दम भरावा असे. आतल्या बाहुल्या उठून येताहेत अशा वाटायच्या.

हात रंगात बुडवून तसेच भिंतीवर मारलेले. त्यांना पाय, चोच, तुरा दाखवून कोंबडा-कोंबडी दाणं टिपणारे असायचे. आजीला रेषा अगदी लयदार जमायच्या. तिच्या सुरकुतलेल्या कातडीवर जशा रेषा दिसायच्या आगदी तशा. आजीच्या हातची कातडी मी हाताने ओढून लांब करीत असे. सोडून दिल्यावर ती कातडी आकुंचन पावून जागच्या जागी बसे याचे मला कुतुहल वाटायचे. भिंतीवरच्या टिंबा हातावर गोंदलेल्या टिंबाच्या सारख्या मृदु वाटायच्या.

देव्हाऱ्याच्या भिंतीवर तुळशी वृंदावन, तुळशीची बारीक पानं आणि त्यावर डुलणारी मंजिरी खुलून दिसायची. पानाफुलांच्या वेली तिच्या मनाप्रमाणं वळण घेतलेल्या आसायच्या. अजूनही तशा वेली शोधतो आहे. नंतर कव्हातरी ती भिंत सारवली गेली. तिच्यावर आजीचा चितारणारा हात फिरला नाही. चांदण्याच्या आभाळावर. ढग सरकले. बहरलेला वृक्ष वठून गेला.

# वठलेल्या वृक्षामागे

**वि. मा. सुरंगे**

ही वडीलांची आजी. पण माझी एकट्याचीच वाटायची. लहानपणी तिचे दुध नसलेले स्तन ओढताना अतृप्तीचं पण हवंहवंसं वाटणारं समाधान. हृदयतृप्तीचा भास. मिटलेल्या पापण्यांतील आभास !

अंधारपाण्यातील लय आणि मृगजळातील लय. मनात वलय.

धगीचं उन्हं. त्या तरूणीच्या अंगातून घामाच्या धारा वाहताहेत. खूप घशाला कोरड पडलेली. आणि त्यात अधाशीपणे वरून पाणी पिते आहे तेव्हा तिच्या घशावर उठणारी वलयं मंत्रमुग्ध करणारी. पूर्ण गोरी वलयं. वाटत राहातं मृगजळाला तेथूनच सुरूवात होते की काय ?

अंधार वलयात झाडं झोपतात तसाच हा वृक्षही मी बसलेला दगड अगदी दगडासारखा वेदनाहीन. ह्या झाडाला लयदार वेदना. स्वप्नात हरवलेल्या.

हा वृक्ष बहरलेला होता तेव्हा आम्ही त्याच्या

(पुढील मजकूर पान १७ वर पहा)

# बळी

**राजन गवस**

बी. ए. भाग- १

फाल्गुन महिन्याची दुपार निरोप घेऊन आली. आमच्या घरात स्वच्छंदी मंद झुळुकांचं हिंदळणं सुरू झालं. गर्द गारवा आला. आईच्या चेहऱ्यावर गुलाब-पाण्याचे तुषार शिंपल्याची प्रसन्नता आली. बाबा हरखून गेले. तो निरोप घरातील हलक्या मलक्या कृतीत काव्य भरू लागला ! एकाच वेळी आसमंतातील निळाई गवसल्याचा आनंद तर त्यात श्रावणी घनांची दाटीवाटी यांचं रोमहर्षक चित्र जिवंत होऊन घरभर हिंडू लागलं !

पल्लवीच्या वागण्यात फेरफार झाला. इप्सित गवसणार असल्याचा दावा प्रसन्नमुद्रा करीत होती. तिचं चिंतामुक्त हास्य मी कधीच पाहिले नव्हते. बाबांनी हिरीरीनं सांजगप्पा लावलेल्या पाहिल्या-ऐकल्या नव्हत्या. रोज एकच दिसायचं. गुडघ्यांची मोडकी मांगड आणि त्यावर लटकलेली मान ! आईचं वागणं खोकत खोकत काजळी-दिवंरीच्या जळण्या-सारखं. त्यात उजळणं आलं होतं ! मी चौथीतला पोर. बघू नये म्हटलं तरीही मनात हे ठासून बसायचं सारं. या साऱ्यातही हसतखिदळत जगावं म्हटलं तरी पल्लवीचं आकस्मित रुदन काळजाला झोंबायचं- विचार करू नये म्हटलं तर मोठा राक्षस कानठिळ्या बसेपर्यंत ओरडायचा. मी सकाळ संध्या-काळ बाबांच्या 'बैठकीत' असायचा .. झिंगल्या मनानं ! ... हे सारं पालटलं .. शिशिराच्या पतझडी-तून पल्लवधारी ऋतूराज आला. माझ्या घरात घुसला. खुल्या दिलानं बागडू लागला. प्रफुल्लता घरादारातून खिडकी-कवाडातून झिरपू लागली ... हलक्या गोष्टी-तील लयता गप्पाटप्पांतील गेयता मी लुटण्यास कमी केलंच नाही ! अधाशी ! !

निरोपा पाठोपाठ पाहुणे आले. बाबांनी आथित्य खुल्या मनानं केलं. ग्रामीण शिरस्त्यानुरूप थाळी भरून शेंगा .. गुळ ... नव्या मडक्यातील थंडगार पाणी शीत-पेय म्हणून दिलं. पल्लवीला बाबांनी हाक दिली. जाड्याभरड्या अस्मानी रंगाचं पातळ नेसून ती आली. पाहुण्यांच्या समोर पाचसहा फूट अंतरावर ठेवलेल्या पाटावर बेताने बसली. मुद्रा प्रसन्न, टवटवीत. दृष्टी विनम्र. ना अलंकार ना कसला शृंगार ! अज्ञात-वासातील पांडवांची द्रौपदी ...! वनवासी सीता ! ! माझं डोळं टच्चून पाणावले. आलवाले गरावली. कोवळ्या किरणांनी पहाटे कौलारू घरावरून घरंग-ळावं ... पागोळीतून सांडावं ... तसंच होऊन गेलं सारं !

दिवेलागण झाली. तुळशीवृंदावनात, झुंजुमुंजू प्रकाशात सांजगप्पा रंगल्या. पल्लवीच्या लग्नाचा विषय. तिचे गोड लाजणे. पदराशी चाळे. वेणीचा वारंवार गुंफा. मी तिच्याजवळ जाऊन बसलो. तिनं मला ओढलं, जवळ घेतलं. तिचा हात पाठीवरून फिरत होता. माया, ममता मला ओवाळत होती. आस्मान ठेंगणं पडलं होतं ! माझ्या दारी स्वर्गसुख आलं होतं. आईनं पल्लवीला विचारलं--

"पल्लवी नवरा हाय पसंत ?"

ती मुरडली. स्मितावली. लाजली म्हणाली,

"तुमच्या शब्दाबाहेर नाही !"

आईबापाच्या संमतीला किती मार्मिक पसंत दर्शवली होती तिनं !

पल्लवी माझी बहिण. साऱ्या जबाबदाऱ्या पेला-यला सर्वप्रथम जन्माला आली. स्त्रियांमा ज्याची हाव असते असं रूपही घेऊन आली. साठ रूपड्या दरमासी मिळवायला बाबा कारकुनी करत. संसार गाडा अडकून बसला म्हणून वयाच्या दहाव्या वर्षापासून भांगलण शिगलण करायला जाऊ लागलो. घरकाम कधीचं पडलं नाही. बाजार कधीच आडला नाही. तसं बघाय गेलं तर मी तिला आक्का म्हणायला हवं होतं. पण मोठ्याचं लहानांनी घ्यावं तसं मी घेतलं. मीच काय साऱ्यांचीच ती पल्लवी झाली. तिच्या लग्न ठरावाचा आज दिवस होता. पाहुणे आश्वासनानुसार आले. ठरावावर घासा-घासीझाली. बाबा जितकं थंड होऊन बोलता येईलं तेवढं

बोलत होते. चार चौघे आमच्याकडील बकिली करत तर चारचौघे तिकडील... संवादाची खडाजंगी... जणू काय एखाद्यात सारं संपुष्टात येणार... त्यावेळी माझं काळीज धस्सऽ व्हायचे. मधेच त्यांच्या गप्पा. निरव शांतता. मध्येच मागणी... खडाजंगी... परत बोलणी... विनोद. गप्पा. बाबा आर्जवून सांगायचे–

"मी श्रीफळ व मुलगी देणार !"

"छे ! छे ! ! एक हजार हुंडा... पाच भांडी... पेरावा... आणि अक्षता..."

"पोरगा नोकरदार हाय...चार हजार मोजला तर मिळणार नाही... बघा हे सस्तात..."

"छा: या गुणाचं पोरगं चार खेड्यात मिळायचं न्हाई गा... आणि जातीगोतीत तर बगायला नको..."

"पटत असलं तर बगा, न्हायतर उठलाव आम्ही !" मुलगीला जन्म दिल्याबद्दल ते आम्हाला दंड ठोठावत होते. जसं काही त्यांनी मुलग्याला जन्म देऊन उपकार केला होता ! !

रस्सीखेच मध्यावर आली पाचशे रूपये बोलून हुंडा. पाच भांडी आणि पेरावा. ना दागिना ना कांही... अक्षता वराचे घरी...ठराव पास होण्यास दीड वाजले. रात्री साखर वाटली. आमच्याची मुलगी आमक्याच्या घरात दिली हे पुकारलं. साखर खाल्ली. तोंड गोड झालं. रिवाजाप्रमाणं सकाळी पाहुण्यांच्या सोबत पुरणपोळ्या दिल्या. वरपक्षानं म्हाताऱ्या कोताऱ्यांना दाखवायला पल्लवीचा फोटो मागितला. फोटो दिला. पाहुणे कोवळ्या किरणावरून वाट तुडवीत होते..पल्लवी परसदारातून पहात उभी होती.. तहानवली नजर.. वेडी आशा... खुळं यौवन... खुळा वसंत. तिच्या मनाच्या लाख पाकळ्या फुलल्या होत्या...मी हर्षभारीत झालो होतो..

दोन प्रहरी शाळेहून आलो. पोस्टमन पत्र देऊन गेला होता. मी पत्र फोडलं साऱ्यांच्या नजरा विस्फारल्या. पल्लवीचा फोटो परत आला होता. मंदहास्य फोटोवर नजळत होतं सोबत चिठ्ठी होती. मी अडखळत अडखळत वाचली.

"सोबत फुटो आला. तरी असं समजतं की मुलगी नवसाची आहे. तिला जोगीण म्हणून सोडलेलं आहे. नवरा मुलगी नापसंत आहे, तेव्हा ठराव मोडलेला आम्ही कळवीत आहोत...!"

मुलाएवढं काळीज पसरून ऐकणारी माणसं काळीमिट्ट झाली. आईला घेरी आली. साऱ्यांनी तिला सांभाळलं. तिला आता बोलताच येत नव्हतं... माझं काळीज पाण्याहूनही पातळ झालं होतं... आणि पल्लवी...? गंभीर ! धीरगंभीर ! ती भरकन घरात गेली. सहा वर्षाच्या धाकट्या छबीला कवटाळून ओकसाबोक्षी रडू लागली...

बाबांची धावपळ तालुक्याहून आली. जमीन गहानवट टाकून दीड हजारची उचल केली होती. किडुकमिडूक सोन्याची मोडतोड केली होती. पैशाची जमवाजमव करण्यास रात्रीचा दिवस झाला होता. अखेर कावळा बसायला फांदी मोडली होती ! त्यांनी पत्र वाचलं, दांडीवरील धोंगड घेतलं, निजून टाकलं... लोक येत होते... जात होते... समजावत होते. कुणी सांगत होते. मलाही झोप केव्हा लागली कळली नाही.

सकाळी जाग आली. सारी झोपली होती. मी आईला उठवलं पण ती बोलत नव्हती... पल्लवी अंथरूणात नाही हे तिनं पाहिलं... शोधाशोध करायला बाबांना हालवलं... पण ते उठले नाहीत... इतक्यात कुणीतरी सांगत आले पल्लवीनं विहिरीत उडी घेतलीय...!...? प्रेत विहिरीत नितळ पाण्यात दिसत आहे... मी तिकडं धाव घेतली. प्रेत वरती आणलं होतं... मी पागावल्या डोळ्यानी कडकडून मिठी मारली... ती बोलत नव्हती. मंदपणे हासत नव्हती... लोक मला हिसकावून घेत होते... तरीही मला तिला सोडवत नव्हतं...!

कोणतरी म्हणालं ... 'प्रेत कुणी काढलं वर ? ढकला आत... पोलीस पाटीलानं रपोर्ट दिल्या–शिवाय मढं वर काढायचं नाही... तो हजर पायजे...!'

प्रेत पुन्हा आत लोटण्यात आलं... मलाही तिच्याबरोबर उडी मारायची होती. पण लोक सोडत नव्हते... प्रत्येकजण येऊन विचारत होता... '...कोण मेली ? का-?... कशासाठी...?' एखाद् दुसरा सांगत होता.

'ती...रं पल्लवी...? चाळू पाटलाची...?'

'पल्लवी...?...?...?'

लोक तिला पल्लवी म्हणत होते... आईबाप तिला पल्लवी म्हणायचे का पल्लवी ...? हजार लोकांचे हजार बोल... बरं वाईट...

'भावासाठी भन बळी गेली !'

'पोरग्यासाठी पोरगीचा बळी दिला...!'

'हे गा पदर घेऊन चार वर्षं घरात व्हती...!...?'

'घडलं आसंल बरं वाईट... म्हणून घेतलीन उडी !'

'व्हय... व्हय...'

मला एवढं समजत होतं. पल्लवी आमच्या घरात जन्मली. गरीबीशी नांदली. रोजरोजच्या रडण्यात हासली. माझ्या आधी जीवनपट संपवून गेली... ती माझ्यासाठीच पल्लवी होऊन जन्माला आली...?...?...?

'छे ! ती पल्लवी नसून पल्लवी आहे...? ती पल्लवी आहे...!! ती पल्लवी आहे...!!!'

मी ओरडून सांगत होतो... पण... कुणीच... ऐकत... नव्हतं !!

✠

( पान १४ वरून चालू )

सोबत दिवस घालवित असे. त्याचा झाडलेल्या आम्र-यच्या. कुठेतरी एखादी चिच अंग चुकवून लटकत असायची. कोवळी पालवी फुटायची. बोट लावलं तरी दुखापत होईल अशी. मग मोहर यायचा. अगदी नाजूक मोराच्या स्वप्नासारखा. कुणाच्या तरी पारणी कुंचल्याने तो मोहर चितारलेला असायचा. फिक्कट पिवळ्या पाकळ्यांवर फिक्कट भगवे स्वप्न. त्या मोहरात आम असायची. तो खाऊन गिळताना डोळे मिटायचे. अशी अनेक सौंदर्य स्थळे त्याच्या सावलीत रेंगाळत असायची.

हे दुपारचे ऊन आणि त्याच्या वठलेल्या आठवणी शितल चांदण्यानी पेटू लागतात. आजीची आठवण होते. वृक्ष काखा वर करुन असतो आणि मी स्तब्ध. डोळ्यात गोंधळ माखुन रहातो. ✠ ✠


मराठी शाळा,
हायस्कूल्स,
११ वी १२ वी व
कॉलेजची

**पुस्तके**
व
**गाईडस्‌साठी . . .**

**फडके बुकसेलर्स**

**महाद्वार रोड, कोल्हापूर– ४१६००२**
फोन नं. ५८७५



मराठीतील दर्जेदार
ललित पुस्तकांसाठी–

**श्रीनाथ बुक एजन्सी**

**१४७६ बी, मंगळवार,**
कोल्हापूर.



## वाटा

ह्या वाटाच खऱ्या नाहीत
अंधारातून जाणाऱ्या
इथपासून तिथपर्यंत कामाच्या !
भिंतीवर केव्हा पडलेल्या छायेवर
जीव टाकणारे मन
दर्शनी बाजू सजवून !
आत नुसता भूसा झालाय
केव्हा जळेल मनासह शरीर
कुणी सांगावं ?
फुललेल्या अंगारावर पाखरं मरतात
पायाना लळा लावणाऱ्या
ह्या वाटाच खऱ्या नाहीत !

## जोगी

दान पुण्याचे घेऊन
वाट पापाची चाललो
किती दिवसांनी आज
तुझ्या दारांत मी आलो.
नको अव्हेरूस मला
वाढ झोळींत जोगवा
फक्त एकदां पाहूं दे
तुझ्या डोळ्यांत चांदवा

**मनोहर जोशी**
एम. ए. भाग २

## झाड

वरून झरतात पानं विद्ध
तर याच झाडाखाली थांबायचे का ?
मिटल्या पापण्यांत न फुलणाऱ्या स्वप्नांना
फिरून फिरून सजवायचे का ?
ह्या पायाना व्यसनच लागले आहे
नुसतंच चालायचे झाडापर्यंत
एका फुलाच्या अपेक्षेत
क्षणांचे दिवस घालवायचे का ?
वरून झरते आहे बर्फ आणि अंगार
तर तुझ्याच झाडाखाली थांबायचे का ?

**वि. मा. सुरंगे**
एम्. ए. भाग २

## वेडी राधा

पहाटवारा धुंद असा हा
पारिजातचा गंध निराळा
ओसबिंदूचा असा सोहळा
अरुणोदयाने जरा लाजला
दूर दूर तो नाद कशाचा ?
पर्वतीवरी सूर कुणाचा ?
बासरीवरी गीत शांत ते
घनश्यामा खुलवाया ते !
पाहूनि राधा मंद हसे रे
जमुने काठी वाट पहातसे
जलतरंगी प्रणय दिसे रे
पण, अखेर सारे स्वप्नच भासे !

**कु. उल्का भुतकर**
द्वितीय वर्ष साहित्य

# कविता

## संध्याकाळची कविता

फिक्कट पिवळे रंग उधळूनी
गंधीत संध्या मावळली
चंद्र चुड्याचे भान हरवूनी
आज अचानक चाळवली
धुसर धुसर नग्न सफेदी
लोट धुराचे वर चढती
कुरूऽकुरू वाजे बन वेळूचे
आत लकेरी सरसरती !
नादमय हा झरा वाहतो
इथे जांभळा आरस्पानी
लाजलाजूनी आत पाहतो
मनात हरवून जला दर्पणी !
निनळ निखालस यौवन ओले
मंद पाऊले अडखळनी
तिच्या उरातील दूध सांडले
मुक्या चांदण्या धडपडती

**अशोक परीट**
बी. ए. भाग २

## गुन्हा

नजरेत अचानक वळून पाहिले तुझ्या
होती त्यात आर्तता जी हवी होती मला
कां एकाएकी भाव लोपले त्यातील ?
कां पाहिले मी हा घडला माझा गुन्हा ?

**मनोहर जोशी**
एम. ए. भाग २

## गुपीत

इथेच आम्ही गिरवीत होतो
गुपीत धुक्यातील हळवे कवळे
आणि मनातील नवथरलेले
पूर्ण चांदणे उरात भरले !
दोन मनातील ते आक्रंदन
हळू बिलगूनी असे निमटले
आणि माझिया मनात हमता
एक पाखरू निघून गेले ! !
हे हृदयी गीत मनोहर
तार छेडिता मनात घुसले
आणि माझिया मनात लपता
श्वास जुईचे घुसमटलेले ! !
शब्द निमटले श्वासामधूनी
हसून रुसले कवळे मार्दव
आणि माझिया मनात दडले
गंध कळीचे उनाड लाघव ! ! !

**अशोक परीट**
बी. ए. भाग २

## गझल

अंधार अंध होता, सांगु व्यथा कुणाला ?
माझ्याच आसवाना, माझाच वीट आला
अनाथ होवूनी मी, जगात नांदताना
ते मायतात म्हणूनी, मारू मि ी कुणाला ?
आभाळ विष झाले, मी ढग वेचताना
हे शल्य बोचणारे, सांगू कसे मनाला ?
माझाच एक गुन्हा, जन्मुन या जगी रे
त्या दोष नशीबाला, देवू आता कशाला
तुटतील बंद सारे, होईल सूर्य काळा
या क्रूर दैवताला, देईन मी सुळाला !

**राजन गवस**
बी. ए. भाग १

India's foremost manufacturers
of name plates
for all industries.
We also export

# 'METAGRAPHS'

Renown name in cycle industry

for

its all types of metal lables.

## METAGRAPHS PVT. LTD.

164, Tulsi pipe road, Matunga, Bombay.

Phone : 453853 Gram : Metagraphs

# हिन्दी



राष्ट्रभाषाके सिवा मेरा राष्ट्र गुंगा है ।

— महात्मा गांधी

एक चिंतन ।

एक लेख ।

एक कथा ।

पाँच कविताएँ ।

शिवराज ७१।७८

# महँगाई !!

कु. उल्का धों. भुतकर
द्वितिय वर्ष म.हिन्दी

आज के युग मे सबके मुहमें हमेशा होनेवाला शब्द है । महँगाई । आज का युग महँगाई का युग है । स्वतंत्रता मिलकर सत्ताईस बरस बीत चुके है, लेकिन महँगाई कम नहीं हुओ । वह तेज रफ्तारसे आसमान को छुने लगी है, सर्वोच्चितम शिखर बन गयी है । आज हमारे देशका,समाज का, राष्ट्र का, गांव का, घर का चित्र कुछ विचित्रसा नजर आ रहा है । आज हमारे समाज मे घोर निराशा के सिवा और कुछ नही दिख पडता । देशमें सामाजिक विषमता फैल गयी है । भ्रष्टाचारी, भुखभरी बेकारी, कालाबाजारी तथा बडी महँगाई से पिडीत है । तीस सालसे भारतमें स्वातंत्र्यपूर्व और स्वतंत्रता के बाद भी महँगाई साथी के रोग की तरह बढतीही और फैली ही जा रही है ।

आज बडे बडे शहरोमें जाकर देखेंगे तो गरीबोंके फलोंके समान मासुम बच्चे हाथ फैलाकर भीख मांगते हुए दिख पडते हैं । इन बच्चों को तो न तो पेटभर खाने के लिए अनाज मिलता है । और न पहननेके लिए वस्त्र ! यही है हमारे भारत का असली चित्र ! और इस चित्र का असली कारण है बढतीही जानेवाली जनसंख्या और हमेशा कम होते जानेवाले अनाज ! इस महँगाई के कारण तो समाजका जो निचला स्तर है, वह पीसा जा रहा है । व्यापारी लोग जीवनावश्यक चिजो को दबाकर रख देते है, और मंहगाई होनेपर उन चिजोंको बाहर निकालते हैं । इससे जनता का विशेषकर मध्यम वर्ग और मजदूर वर्गका बुरा हाल हो रहा है ।

आज भारत आजाद होकर कई वर्ष बीत चुके है, लेकिन आज भी अमीर-गरीब की दो दीवारे बनी है । अमीर अमीर ही होते जा रहे है । और गरीब गरीबीमें ही मरते जा रहे है । सिर्फ नारे लगानेसे महँगाई कम हो सकती ? भ्रष्टाचारी और कालाबाजारी लोग गरीबोंका खुन चूस रहे है । आज इस महँगाई के कारण गरीब जनता बहुत ही निराश बन बैठी है । उसे सारा समाज अंधकार भरा नजर आ रहा है । जब इस तरह महँगाई बढती जाती है, तो गरीब भीखमँगे लोग पेट भरने के लिए नये तरीके खोजते है । वे चोर बनते है, खूनी बनते है, समय आनेपर डाके डालते है, घरोंको आग भी लगा सकते है । अनैतिकता असंतोष का तूफान बढता जा रहा है । इस महँगाई के भुखभरी बेकारीके नतीजे यही निकलते है ।

आज महँगाई के कारण सारी जनता अस्वस्थ सी रह गई है । जनता चाहती है कि महँगाई कम हो जाए । भ्रष्टाचार नष्ट हो जाय । कालाबाजारी नष्ट हो जाए । इसके उन्मूलनके लिए जनता जब आंदोलन शुरु करती है, तब इसके बदले उसे जेल जानेकी सजा मिलती है । कैसा अजीब इन्साफ है देखिए ।

वास्तविक कोई भी आदमी जन्मसे खूनी, अपराधी, या चोर नही होता । उसकी मजबूरियाँ उसे ऐसा करने को विवश करती हैं । आदमी की तीन मजबूरियाँ है । 'रोटी' 'कपडा' 'मकान' । जब उसकी आवश्यकताएँ पूरी नहीं होती, तब वह सिधा रास्ता छोडकर टेढे मेढे रास्ते अपनाता है । अगर ऐसी महँगाई न होती अगर आदमी को पेटभर रोटी मिलती,तो क्या वह चोर डाकू बन सकता ? इसका एक मात्र उत्तर है, वह इनमेंसे कुछ नही बन सकता ? बन सकता है, तो सिर्फ 'सच्चा आदमी' जिसके दिलमें इन्सानियत है, दया है, करूणा है, धैर्य है ऐसा भारत का आदर्श आदमी ! लेकिन आज का हाल इसके विपरीत नजर आ रहा है । आजका आदमी आदर्श आदमी के बदले विकृत आदमी बन गया है । यह सिर्फ महँगाई, भुखभरी के कारण ।

जहां जनताने आंदोलन शुरु किया हो वहां सरकार पुलिस को भेजकर, जनता को जेल मे भेजती है । यह इन्साफ अच्छा नही । जनता की यही मांग है– हमे पेटभर रोटी मिले, रहने के लिए मकान और पहननेके लिए कपडा । इन्सान की ये तीन मजबूरीयां है जब ये तीन मजबूरीयां उसे हासिल नही होती याने महँगाई के कारण तब जनता आंदोलन शुरु कर देती है। बार बार यही आवाज उठती है ।

रोटी ! कपडा ! ! मकान ! ! ! आज के तरुण युवकोंको मजबूरीसे दो टोकियोंकी नोकरी करनी पडती है ।

रोटी, कपडा, मकान ये तीन जीवनके परमोच्च निशान है । जब आदमी को ये हासिल नही होते तो समाज मे अनैतिकता का व्यवहार, निराशा, विषमता, झगड फसाद, खून, डाके आदि बातोंकी भर मार होती है । इन सारी बातोंका नेतृत्व महँगाई करती है । यही महँगाई समाजके पतनकी अधोगती मे योग देती है। अत: व्यक्ति तथा समाज के उत्थान के लिए महँगाई का निर्मूलन आवश्यक है । आजके महँगाई के सागर में, बेकारी, गरीबी नष्ट करने की प्रतिज्ञा आज के नवयुवकोंने करनी चाहिए ।

✠ ✠

# सच्चा साथी !!

कु. चोपडे आर. ए.
द्वितीय वर्ष साहित्य

मित्रों के बिना कोई मनुष्य सुखी नही रह सकता। हृदय प्रेम के लिए ही बना है और जब तक इसे प्रेम के आदान प्रदान का अवसर नहीं मिलता, तब तक यह सुखी नहीं हो सकता। किन्तु यदी तुम स्वयं स्नेह नहीं दे सकते तो तुम्हे भी स्नेह नही मिल सकता। जब तक तुम दुसरे को प्यार नहीं करोंगे, तब तक दूसरे भी तुम्हे प्यार करनेवाले नहीं मिलेंगे। प्रेम का पाना केवल पारिस्परिक प्रतिदान पर निर्भर है। इसलिए प्रफुल्लित तथा परोपकारिणी प्रकृती का अनुशीलन न करना बहुत ही आवश्यक है। इसके बिना तुम सुखी नहीं हो स कते। इसके लिए पहले अपने मनमें अकृत्रिम स्नेह होना आवश्यक है। और ये भी आवश्यक है। कि अपने स्नेह की बरसात दुसरोपर अकृत्रिम ढंगसे होनी चाहिये। लेन-देन से मैत्रि बढती है। मनुष्य के लिए सहजीवन ये आवश्यक चीज है। अगर हमने ये माना की जिंदगी चार दिन की है, मगर ये दो-चार दिन ही खुब है। जिस दिनोंमें हम कितनेही संगी-साथी जमा कर सकते है, उनके सुख के लिए कुछ कर सकते है।

यदी तुम्हारे साथी तुमसे स्नेह नहीं रखते तो यह तुम्हाराही दोष है। यदी तुम सदय एवं मित्रवत्सल बनोंगे तो वे तुम्हे प्यार किए बिना न रह सकेंगे। यदि तुम किसी के प्रेमपात्र नही हो तो वह काफी प्रमाण है। तुम प्रेम करने के पात्र नहीं हो।

मित्रतासे ही एकता निर्माण होती है। एकता का विशेष गुण यह है की, जो कार्य हम अकेले नहीं कर सकते, वह दूसरोंके साथ मिलकर आसानिसे किया जा सकता है। जो एकसाथ मिलकर काम करते है, वे चाहे निर्बल और दरिद्री ही क्यों न हो, पर काम कर ही लेते हैं। ऐसा कोई काम नहीं है जो एकता के द्वारा संपन्न नहीं हो सकता। एकता के बल की सीमा नहीं है। वर्षा की बूंद बहुत ही तुच्छ है, पर जब देर तक बूंदे बरसती है, तब धारा बह चलती है और उसके सामने जो कुछ पडता है, उसे अपने प्रवाहमें बहा ले जाती है। वह एकता ही है जिसके कारण सृष्टि में जल इतना बलवान तत्व बना है।

स्नेहरुपी वृक्षपर खिलनेवाले सुंदर फूल का नाम ही सच्ची मित्रता।

दिए जलते है, फूल खिलते हैं मगर

बडी मुश्कील से दुनिया में सच्चे साथी मिलते है।

मित्रही आखरी साँसतक मित्र को साथ देता है। मानव का साया ही उसका मित्र है। और साया जिस तरह धूप-छाँवमें, तुफान में, आधी में मानव की साथ नहीं छोडता उसी तरह मित्र भी होना चाहिये। और जो सदा-सर्वदा साथ देता है वही सच्चा साथी होता है। विपन्नावस्थामें भी जो साथ देता है, जो अपनेही स्वार्थ का विचार नही करता है वह मित्र होता है। रास्ते से जाते समय राही मिलते है मगर साथी नहीं मिलते हैं, मिलते भी है मगर वे जितने जल्द मिलते है उतने ही जल्द बिछड भी जाते है। ये बिछड जानेवाले कभी भी सच्चे साथी नहीं होते। जो अंततक साथ रहता है, दुःख के समय तसल्ली देता है वह मित्र होता है। जो दूसरो से उपकार की आशा भी नहीं करता, जो तन-मन-और धन से मित्र को मदत करता है वही मित्र होता है। अपने स्वार्थ के सिद्धी के लिये जगा होनेवाले कभी भी सच्चे दिलसे मित्रता नहीं रखते। मित्रपर हमेशा जो अकृत्रिम स्नेह रखता, उसकी मदत करता है वही सच्चा स्नेही, संगी-साथी होता ह।

# ममता

**मनोहर जोशी** (शिरपुरकर)
एम. ए. द्वितीय वर्ष

आसमान में शुभ्र बादल मंडरा रहे थे। चन्द्रमा अपनी धीमी चालसे आगे बढता हुआ नजर आ रहा था। कभी चन्द्रमा बादलों में छिप जाता, और कभी वह बाहर प्रकट होता था। ऐसा लग रहा था मानों चन्द्रमा बादलों के साथ आंख मिचौंनी खेल रहा है। चारों ओर निस्तब्ध वातावरण था, शांत और गंभीर।

ऐसे वातावरण में शांति प्राप्त करने के लिए रामबाबू अपने बंगले के छतपर आराम कुर्सीपर बैठे हुये थे। चन्द दिनों से उनका दिल काबू में नहीं था। और कई दिनोंसें उन्हें नींद की भी शिकायत थी। अपने अपने अपको संभलना चाहते थे, लेकिन संभल नहीं सके। बार–बार उन्हें अपनी गलती पर दुख हो रहा था। अपनी इकलौती बेटी पर कभी कभी गुस्सा आ रहा था।

रामबाबू की बेटी वैजयंती एक अनाथ जवान के प्रेम में फॅस गयी थी। उसका न अपना कोई घर था न उसके मां बाप। हर दिन वह अलग अलग आदमी के यहां खाना खाकर अपनी शिक्षा पुरी कर रहा था। नाम था उसका अजीत। बडा ही होनहार, देखनें में सुन्दर, सुडौल। आत्म प्रेमका भाव उसके चेहरे पर झलक रहा था। वैजयंती उसीसे बहुत प्यार करती थी। दोनों कालेज में पढते थे (एम्. ए. में) इसीलिए अजीत का हमेशा ख्याल करती थी। हरतरह से उसकी मदद करने के लिए तैयार थी। दोनों साथ कालेज जाते थे। वहां भी दोनों के बीच में काफी बातचीत हुआ करती थी।

इसीसे कालेज के विद्यार्थीयों के आपस में एक प्रकार की कानाफूसी होने लगी और जहां जहां उनके बारे में चर्चा होती थी। अजीत वैजयंतीसे कहता की वह जैसी अमीरों की बेटी उसके साथ घूमना और बातचीत करना अच्छा नही। यह भी अजीत को दु:ख के साथ कहना पडा था। कालेज के विद्यार्थीयों का उन दोनों की तरफ इशारा करते हुए और दोनों को देखकर हंसते हुए व्यंग करना अजीत के लिए बहुत बुरा लग रहा था। लेकिन वैजयंती के लिए इसकी परवाह नही थी। समाज के प्रति उसने अपने प्रतिक्रिया नहीं दि गयी।

इसी तरह कई दिन बीत गये और यह बात शहर में फैलने लगी। इसका नतीजा यह हुआ की अजीत जिनके यहां खाना खाता था, वहां से नालायक समझकर हटा दिया गया। अब वह मुस्किल में फस गया। वैजयंती अपने घर से उसे कुछ देने लगी। राम–बाबू को धीरे धीरे महसूस होने लगा की आखिर वैजयंती इतने रुपये क्या करती है। उन्होनें इसक पता लगाने का निश्चय किया। एक दिन वैजयंती ने अपने पिता के पास सौ रूपये की मांग की। रामबाबूने उसके जानेसे थोडी देर पहले रुपये दियें और उसका पीछा करने लगे।

संध्या का समय था! वैजयंती गोल्डन गार्डन की तरफ जा रही थी, जाते समय बार बार मुडकर देखती थी। चोर की जैसी उसकी दशा बन गयी थी। आखिर वह गार्डन पहुँच गयी। उसके पिताजी भी तब तक वहां आकर पेड के पीछे खडे हो गये। वैजयंती के सिवा वहां कोई नही था! अजीत की तरह देख रही थी और रामबाबू एक आज्ञात आदमी की। बार बार अपनी घडी की तरफ देख रही थी। लगभग एक घंटा हो गया अजीत नहीं आया। वैजयंती अब उठकर चलने लगी और पीछे पिताजी भी थे। सामने ग्रेन्ड रोड पर एक टेक्सी थी। उसमें बैठकर वह चली गयी। रामबाबू भी दूसरी टेक्सी ढूंढने लगे लेकिन वहां कोई नही थी। अत वे घर चले गये।

वैजयंती, सीधे अजीत के कमरे पर पहुँच गयी। वह वही था। उसे देखकर बुरा भला कहने लगी। क्योंकि संध्या के छ: बजे गोल्डन पार्क आने का उसने वादा किया था। वैजयंती को समझाते हुए अजीतने कहा–

"वैजयंती, मैं ठीक समय पर गोल्डन गार्डन की तरफ जाने ही वाला था कि देखा तुम्हारे पिताजीसही

उसी तरफ जाते थे। शायद वे तुम्हारा पीछा कर रहे थे। इसलिए न जाना ही बेहत्तर समझा।'' वैजयंती का दिल धडकने लगा। वह डर गयी। क्या करे और क्या न करें यह प्रश्न अब उसके सन्मुख था। गुप्त प्रेम इस प्रकार खुल जाय गा, इसका पता नही था। तथापि धैर्य से काम लेना चाहा ! अजित तो बार बार उसे भूलने के लिए कहता था। स्त्री हृदयसे अजीत अपरि-चित था।

